सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई

सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
फोन नं. ०२२-२२६२०६६८, ६९, ७० फॅक्सः ०२२ २२६२०७८९ संकेत स्थळः www.gdcmumbai.org


क्र.शादंमवरुमुं/विवि/सुचना/बाहयआंतरवासिता/हिवाळी २०२०/ 6825/२०२१ दिनांक १७/०५/२०२१

## कार्यालयीन सुचना

सर्व उमेदवारांना कळविण्यात येते की, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई येथे बाहयआंतारवासिता (Externship) म्हणून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक मार्फत शिफारशीची मान्यता घ्यावयाची आहे. अशा सर्व उमेदवारांनी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून शुक्रवार दिनांक २१/०५/२०२१ पुर्वी अथवा त्या दिवशी संध्याकाळी ठिक ४.३० वाजेपर्यत विद्यापीठाने दिलेल्या नमून्यात अर्ज दाखल करणे बंधनकारक राहील. सदर दिनांकानंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

अटी व शर्ती

१. अर्ज करतेवेळी विद्यार्थ्याने ज्या महाविद्यालयातून बीडीएस पूर्ण केले आहे, त्या महाविद्यालयाची ना-हरकत प्रमाणपत्र (स्वप्रमाणित छायांकित प्रत Xerox Self Attessted) सादर करणे बंधनकारक राहिल. जेणेकरुन आपणांस दुसऱ्या इतरत्र महाविद्यालयास अर्ज सादर करणे सोयीचे होईल.

२. जे विद्यार्थी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व्यतिरिक्त कोणत्याही विद्यापीठातून बीडीएस उत्तीर्ण झाले असतील, अशा विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयाचे व विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्राची छांयाकित प्रत सादर करणे बंधनकारक राहिल.

३. भारतीय दंतपरिषदेच्या धोरणानूसार/ संचालकांचे मार्गदर्शन पत्र (दिनांक १२/०५/२०२१२) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक अधिसूचना क्र. ०६/२०१२ व सद्य:स्थितीत कार्यरत आंतरवासिता / बाहयआंतरवासिता संख्या यांचा तुलनात्मक विचार करुन मर्यादित विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार ना-हरकत प्रमाणपत्र दिले जाईल.

४. संबंधितांना सूचित करण्यात येते की, अर्ज सादर केला म्हणजे ना-हरकत प्रमाणपत्र मिळाले असे गृहित धरु नये.

५. सोमवार दिनांक २१/०५/२०२१ रोजी ठिक ४.३० नंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

अधिष्ठाता,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णांलय, मुंबई
DEAN
Govt. Dental College & Hospit
Mumbai 400 001

प्रति,

१. मा. सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
३. मा. संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन मुंबई